
# शाश्वत देशी गोवंश संवर्धनाच्या दिशेने...

मुलाखत

धनंजय सानप

**पुणे कृषी महाविद्यालयातील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागांमध्ये देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या केंद्रामध्ये भारतीय गोवंश सहिवाल, गीर, राठी, थारपारकर, लाल सिंधी याचबरोबरीने राज्यातील देशी गोवंशांतील दूध उत्पादन वाढ, आरोग्य, प्रजनन तसेच राज्यातील वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता याबाबत विशेष संशोधन सुरू आहे. याबाबत केंद्रातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांच्याशी साधलेला संवाद...**



### देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापनेचा काय उद्देश आहे?

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत पुणे कृषी महाविद्यालयाचा पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग आहे. या विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाने २०२० साली देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र मंजूर केले. सहिवाल, गीर, राठी, थारपारकर व लाल सिंधी या भारतीय गोवंशाचा महाराष्ट्रातील वातावरणात तुलनात्मक अभ्यास करणे, हे केंद्राचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये या गाई महाराष्ट्रातील वातावरणामध्ये तग धरू शकतात का? त्यांची दूध उत्पादन क्षमता किती आहे? किती दिवस दूध देऊ शकतात? दुधातील फॅट टक्केवारी किती असू शकते? या निकषांवर येथे संकरित गाईंशी तुलनात्मक अभ्यास सुरू आहे.

### गोवंशाच्या अभ्यासातून कोणते तथ्य समोर आले आहे?

मी पहिल्यांदा सहिवाल गाईबद्दल सांगतो. देशातील सर्वांत जास्त दूध देणारी गाय म्हणून सहिवालची ओळख आहे. जगभरातील २९ देशांमध्ये आपल्या देशी गोवंशाचा प्रसार झाला आहे. या देशांनी त्यांच्या देशातील स्थानिक गोवंशाशी संकर करून विविध जाती विकसित केल्या आहेत. सहिवाल गोवंशाचे वैशिष्ट्ये असे, की ० ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंतच्या तापमानात हा गोवंश तग धरू शकतो. पंजाब, हरियाना आणि राजस्थानच्या सीमाभागात सहिवाल गोवंशाचे पारंपरिक संगोपन करणारा समाज आहे. त्यांनी सहिवाल संवर्धन केले आहे. तसेच अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने पैदासदेखील केली आहे. सहिवाल गाईला संकरित गाईपेक्षा कमी चारा लागतो. ही गाय प्रति दिन ८ ते १६ लिटरपर्यंत दूध उत्पादन देते. याच पद्धतीने आम्ही इतर गाईंचा केंद्रात अभ्यास करत आहोत.

### देशी गोवंशामध्ये शुद्ध जातींचे प्रमाण किती आहे?

सध्या भारतामध्ये एकूण ५३ देशी गोवंश नोंदणीकृत आहेत. मात्र एकूण गोवंशाच्या संख्येमध्ये केवळ २५ टक्के गोवंश शुद्ध स्वरूपात शिल्लक राहिला आहे, तर उर्वरित ७५ टक्के गोवंश क्रॉसब्रीड (मिक्स) स्वरूपात आहेत. या क्रॉसब्रीड गाई देशीच असतात, परंतु एका पेक्षा अधिक देशी जातींच्या संकरातून तयार झालेल्या असतात. उदाहरणार्थ, साहिवाल आणि राठी असा संकर अनेक ठिकाणी केला जातो. राठी ही जात मुळात साहिवाल, थारपारकर आणि लाल सिंधी या तीन जातींच्या संगमातून विकसित झालेली आहे.

### तुम्ही लाल सिंधी आणायला गेला आणि सहिवाल घेऊन आलांत, त्याबद्दल सांगा.

मी धुळे कृषी विद्यालयात डेअरी व्यवस्थापक असताना लाल सिंधी गोवंशावर संशोधन करत होतो. त्यावेळी आम्ही लाल सिंधी गाय पाहण्यासाठी कर्नाल येथे गेलो. तिथे आमच्या लक्षात आले, की लाल सिंधी गोवंश खूप थोड्या प्रमाणात शिल्लक आहे. या गोवंशाच्या जातिवंत पैदासक्षम गाई आणि वळू शेतकऱ्यांकडे उपलब्ध नाही. आम्ही तिथे काही दिवस मुक्कामी होतो. त्या वेळी आम्हाला कर्नालच्या संस्थेने सहिवाल गोवंशावर संशोधन करण्यास सुचवले. आम्हाला तिथल्या शेतकऱ्यांनी सहिवाल गोवंशासाठी चारा आणि दूध नियोजनाची माहिती दिली. त्यामुळे आम्ही सहिवाल गोवंशावर काम करण्याचे निश्चित केलं. २०१५ साली १८ सहिवाल गाई आणून सहिवाल क्लब ऑफ महाराष्ट्राची स्थापना केली. त्यातून आज कोकणापासून विदर्भापर्यंत प्रत्येक विभागात सहिवाल गाई दिसत आहेत. साहिवालची मागणी देशात वाढली आहे.

### शुद्ध वंशाचा लाल सिंधी गोवंश कमी झाला आहे, त्यांचे कारण काय?

शुद्ध देशी वंशाच्या लाल सिंधी आज शेतकऱ्यांकडे सहज उपलब्ध नाहीत. कारण मोठ्या प्रमाणात संकरीकरण झाले आहे. लाल सिंधी गोवंश मूळचा सिंध प्रांतातील. परंतु फाळणीनंतर काही गाई सिंध प्रांतात गेल्या, तर काही भारतात राहिल्या. त्यामुळे या गाईवर तसे फार लक्ष देण्यात आले नाही. त्यामुळे आता देशी गाईंच्या एकूण संख्येत शुद्ध जातीच्या लाल सिंधीचे प्रमाण ०.३ टक्का उरले आहे. आज जेथे देशी गाय संशोधन केंद्र आहे, त्या भूमीवर १८८७ मध्ये ब्रिटिशांच्या विभागामध्ये ६०० लाल सिंधी गाई होत्या. त्या वेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांना या गाईंच्या दुधाचा पुरवठा केला जाई. परंतु पुढे संकरिकरण कार्यक्रम आल्यानंतर या गाई कृषी विद्यालय, धुळे येथे पाठविण्यात आल्या. त्यावर तिथे संशोधन सुरू केले. आता आम्ही या केंद्रात भ्रूण प्रत्यारोपण, एम्ब्रियो ट्रान्स्फर आणि आयव्हीएफ करतो.

### आपली गीर गाय आता ब्राझीलकडून आयात करावी लागत आहे?

सध्या जगामध्ये सर्वाधिक गीर गाईंची संख्या ब्राझीलकडे आहे. पण तिचं मूळ गुजरात आहे. १९६० ते ७० च्या दशकामध्ये ब्राझीलने भारताकडून कृष्णा नावाचा गीर वळू तिकडे नेला. त्याची त्यांनी ब्रीडिंग पॉलिसी राबवली. त्यातून तिथे गीर गाईंची दूध उत्पादन क्षमता ३० ते ३५ लिटरपर्यंत पोहोचली. विशेष म्हणजे आता भारतातील शेतकरी आणि सरकारी विभागदेखील ब्राझीलमधून गीर गोवंशाच्या रेतमात्रा आयात करत आहे. या गोवंशाचे वैशिष्ट्य म्हणजे, तिची शरीर रचना पिळदार आहे. त्यामुळे गीर बैल शेती कामासाठी उत्तम आहेत.

### राठी गोवंश संवर्धनाबाबत तुमचा काय अनुभव आहे?

राठी राजस्थानमधील गाय आहे. बिकानेर तिचं मूळ आहे. बिकानेरचा राठ समाज या गाईचं पारंपरिक पद्धतीने संवर्धन करतो. त्यामुळे राठ समाजाकडे मोठ्या प्रमाणात राठी गाई आहेत. बिकानेरचे तापमान आणि चारा स्थितीचा आपल्याला अंदाज आहे. त्या वातावरणातही राठी १६ ते १७ लिटर दूध देण्याची क्षमता राखून आहे. आमच्या केंद्रात राठी गाईने उच्चांकी साडेएकोणीस लिटर दूध दिल्याची नोंद आहे. म्हणजे राठीमध्ये तेवढी क्षमता आहे. परंतु तिचं चारा-पाणी व्यवस्थापनही काटेकोर करावं लागतं.

### थारपारकर गोवंशाचे वैशिष्ट्ये काय?

थारचं वाळवंट पार करून जाण्याची ज्या गोवंशामध्ये क्षमता आहे, तिला थारपारकर म्हणतात. देशामध्ये सध्या सर्वात महागडी गाय म्हणून थारपारकरकडे पाहिले जाते. अलीकडेच सुरतगडला लिलाव झाले. त्यामध्ये थारपारकर गाईची किंमत सात लाख रुपये होती. कारण ० अंश सेल्सिअसपासून ते ५२ अंश सेल्सिअस तापमानापर्यंत हा गोवंश तग धरून राहतो. म्हणजे देशाच्या कोणत्याही भूप्रदेशात या गोवंशाचे संवर्धन करता येते. परंतु तिची दूध उत्पादन क्षमता ८ ते १३ लिटरपर्यंतच आहे. देशातील पाच दुधाळ गोवंशावर आम्ही संशोधन करत आहोत.

### राज्यातील देशी गोवंश संशोधनाबाबत काय सांगाल?

महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये प्रदेशनिहाय देशी गोवंश आढळतात. कोकण विभागात कोकण कपिला, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार, मराठवाड्यात देवणी व लाल कंधारी, अहिल्यानगरच्या डोंगरी पट्ट्यात डांगी, विदर्भात गवळाऊ आणि कठाणी हे गोवंश आहेत. या गाई सरासरी प्रति दिन २ ते ४ लिटर दूध देतात. त्यांच्या नैसर्गिक क्षमतेनुसार दूध उत्पादन मर्यादित असले तरी, देशी गाईंच्या दुधाला मागणी असल्याने शेतकरी व्यावसायिक दृष्टिकोनातून या गाईंना प्राधान्य देतात. मात्र यामध्ये जातिवंत गोवंशाची उपलब्धता हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. परंतु आता भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान उपलब्ध आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने एका उच्च दूध देणाऱ्या गाईपासून एका वर्षात २० पर्यंत कालवडी तयार करणे शक्य झाले आहे. संशोधन केंद्राच्या माध्यमातून सहिवाल, गीर आणि थारपारकर या जातींच्या टेस्ट ट्यूब बेबी कालवडी तयार करण्यात आल्या आहेत. सध्या महाराष्ट्राच्या वातावरणात नैसर्गिक पद्धतीने जन्मलेल्या कालवडी आणि आयव्हीएफ तंत्रज्ञानातून जन्मलेल्या कालवडी यांचा तुलनात्मक अभ्यास सुरू आहे. योग्य पद्धतीने पैदास, व्यवस्थापन आणि पोषण केले तर देशी गोवंशापासनही उत्तम दूध उत्पादन मिळू शकते, हेच आमच्या संशोधनातून समोर येत आहे.

### राज्यातील देशी गोवंशाची काय वैशिष्ट्ये आहेत?

डांगी गोवंश जास्त पावसाच्या भागात सहज टिकतो. खूर मजबूत असल्याने चिखल किंवा भातशेतीत या गोवंशाला त्रास होत नाही. डांगी गाय दिवसाला ३ ते ४ लिटर दूध देते. कोकण कपिला ही आकाराने लहान गाय आहे. तिची उंची साधारण ३.५ ते ४ फूट असून, कमी चारा लागतो. कोकणातील दमट व जास्त पावसाच्या हवामानात हा गोवंश चांगला टिकतो. गाय दिवसाला ३ ते ४ लिटर दूध देते. गवळाऊ हा विदर्भातील गोवंश आहे. बैल शेतीकामासाठी मजबूत असतात. ही गाय दिवसाला ३ ते ४ लिटर दूध देते. देवणी, लाल कंधारी हा मराठवाड्यातील महत्त्वाचा देशी गोवंश आहे. हा गोवंश दूध उत्पादन आणि ओढ कामासाठी महत्वाचा आहे. गाईंची दूध देण्याची क्षमता ६ ते १० लिटर आहे. खिलार गोवंश हा पश्चिम महाराष्ट्राची शान आहे. हा गोवंश बैलगाडा शर्यतीसाठी खूप प्रसिद्ध आहे. खिलार गाईंची दूध उत्पादन सरासरी कमी असले तरी काही निवडक खिलार गाई ८ ते १२ लिटरपर्यंत दूध देतात. महाराष्ट्रातील देशी गोवंशावर आम्ही संशोधन करत आहोत. तसेच वर्षभर पशुपालकांसाठी आमच्या केंद्रामध्ये विविध विषयांतील प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. याचा पशुपालकांना चांगला फायदा झाला आहे.